दैनिक
# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ६१ वा रविवार दि.०४ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


# संवेदनशील, प्रतिसादात्मक प्रशासनासाठी सर्वांनी कुटुंब म्हणून काम करावे-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुग

**महसूल पंधरवडा अंतर्गत महसूल अधिकारी, कर्मचारी यांची कार्यशाळा उत्साहात पंधरवड्यात होणाऱ्या उपक्रमांबाबत क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी यांना मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनाचा मान कोतवाल, तलाठी, महसूल कर्मचारी संघटना पदाधिकाऱ्यांना**

लातूर :- महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा असून सर्व शासकीय विभागांशी समन्वय ठेवून शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचे काम महसूल विभाग करतो. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी महसूल विभाग जोडला गेला आहे. त्यामुळे आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक अर्ज, निवेदनाला कागद न समजता, त्यामागील मानवी चेहरा वाचून त्यावर योग्य आणि गतिमान निर्णय घेण्याची जबाबदारी प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याची आहे. यासोबतच प्रशासनाची ओळख संवेदनशील आणि प्रतिसादात्मक प्रशासन अशी होण्यासाठी सर्वांनी एक कुटुंब म्हणून मनापासून काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. महसूल पंधरवडा अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात झालेल्या महसूल अधिकारी, कर्मचारी यांच्या कार्यशाळेत जिल्हाधिकारी बोलत होत्या. प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, सुशांत शिंदे, शरद झाडके, मंजुषा लटपटे, अविनाश कोरडे, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, जिल्हा कौशल्य विकास सहायक आयुक्त बालाजी मरे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह तहसीलदार, नायब तहसीलदार, महसूल सहायक, तलाठी, कोतवाल यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन नियोजित असतानाही त्यांनी पुढाकार घेत या कार्यशाळेला उपस्थित कोतवाल, तलाठी, महसूल कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून त्यांना कार्यशाळेच्या उद्घाटनाचा मान दिला. लोकाभिमुख प्रशासन प्रणालीमध्ये महसूल विभागाची जबाबदारी महत्वाची असून प्रशासनातील मुख्य घटक म्हणून हा विभाग ओळखला जातो. या विभागातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी हा आपत्ती व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्ती यासारख्या अनेक आव्हानात्मक परिस्थितीत कशाचीही पर्वा न करता आपली जबाबदारी पार पाडतो. त्यामुळे नागरिकांच्या या विभागाकडून अनेक अपेक्षा असून या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. याचप्रमाणे महसूल पंधरवडा साजरा होत असताना विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असून यामाध्यमातून महसूल विभागाच्या कामांसोबतच शासनाच्या विविध महत्वपूर्ण योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे आणि जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. या पंधरवड्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना यासारख्या योजनांच्या जनजागृतीसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून हे उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तहसीलदार, उपविभागीय कार्यालयात 'महसूल लायब्ररी' प्रशासकीय कामकाज सक्षमपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक अधिकारी,



कर्मचारी यांनी मानसिक व शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी आपले आरोग्य, आहाराकडे लक्ष द्यावे. प्रत्येकाने दैनंदिन व्यायामाला महत्व द्यावे. यासोबतच सर्व तहसीलदार, उपविभागीय कार्यालयांमध्ये 'महसूल लायब्ररी' तयार करावी. यामुळे महसूल विभागात नव्याने येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना महसूल विभागाच्या कामकाजाची माहिती मिळेल आणि कामकाज अधिक अचूक होण्यास मदत होईल, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थींचे स्वागत महसूल पंधरवडा अंतर्गत २ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेबाबत विविध उपक्रम राबविणे नियोजित होते. या योजनेतून लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, महिला व बाल विकास विभाग आणि कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योजकता केंद्रामध्ये २० प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आल आहे. या सर्व प्रशिक्षणार्थींचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ही सर्व युवकांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. या योजनेतून युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणार असून भविष्यात नोकरी मिळविताना या अनुभवाचा त्यांना लाभ होईल. त्यामुळे प्रत्येक प्रशिक्षणार्थी यांनी चांगल्याप्रकारे काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले. महसूल पंधरवडा काळात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, जिल्हा कौशल्य विकास सहायक आयुक्त बालाजी मरे, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेब उस्मानी यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांनी केले. नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी आभार मानले.

# आमदार धिरज देशमुख यांच्या हस्ते विविध विकासकामांचे लोकार्पण

## औसा तालुक्यात घेतल्या गाठीभेटी : ग्रामस्थांशी साधला संवाद

लातूर / प्रतिनिधी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांनी औसा तालुक्यातील हळदुर्ग, बर्हाणपूर, अंदोरा यासह इतर गावांना भेटी देवून येथील ग्रामस्थांशी शुक्रवारी संवाद साधला. तसेच, येथे विकास कामांचे आ. धिरज देशमुख यांच्या हस्ते लोकार्पण व शुभारंभ करण्यात आले.

हळदुर्ग (ता. औसा) येथील ग्रामस्थांशी आ. धिरज देशमुख यांनी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. या अडचणी सोडविण्याची ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली. त्यानंतर औसा तालुक्यातील बऱ्हाणपूर येथे आमदार स्थानिक विकास निधीतून मंजूर श्री नरहरी उबाळे यांचे घर ते समाज मंदिराकडे जाणार्या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक करणे (८ लक्ष) या कामाचा आ. धिरज देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. दलित वस्ती सुधार योजनेतून झालेल्या पेव्हर ब्लॉक रस्ता







काम, जलजीवन मिशन अंतर्गत नळजोडणी, आरो फिल्टर शेड आदी विकासकामांचे लोकार्पणही याप्रसंगी करण्यात आले. यावेळी गावातील विकासकामांची पाहणी करून आ. धिरज देशमुख यांनी ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या. औसा तालुक्यातील अंदोरा येथे आमदार स्थानिक विकास निधीतून मंजूर शजहांगीर पठाण यांचे घर ते अजमीर पठाण यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे (८ लक्ष), उमर फारूक मस्जीद ते बाबू तांबोळी यांचे घरापर्यंत, महंमद शेख यांचे घर ते श्री सूरज पठाण यांचे घरापर्यंत व उर्दू शाळा ते श्री वाहेद पठाण यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे (१० लक्ष), गावातील जिल्हा परिषद शाळा व बोरगाव रस्त्यावर बसविलेल्या १०० केव्हीए डीपी, पाण्याची टाकी व सार्वजनिक विहीर बांधकामांचे आ. धिरज देशमुख यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. तसेच, अमृतदिन पठाण यांचे घर ते श्री फकीर पाशा पठाण यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे, श्री अस्लम भांगे यांचे घर ते श्री मुक्तार भांगे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे आणि श्री अहमद पठाण यांचे घर ते श्री अतिक पठाण यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे या कामाचा शुभारंभ याप्रसंगी करण्यात आला. याप्रसंगी प्रमोद जाधव, धनंजय देशमुख, नारायण लोखंडे, अनुप शेळके, सदाशिव कदम, महेंद्र भादेकर, दत्तात्रय शेळके, शिवप्रसाद शिंदे, अशोक जंगाले, राहूल पटणे, ज्ञानोबा जंगाले, श्रीनिवास कुलकर्णी, कमाल पटेल, असगर पटेल, नयुम पटेल, शेरखान पठाण, शिकूर पठाण, बालाजी लोंढे, दगडू ढोले, बालाजी मुळे, अमृता जावळे यांच्यासह ग्रामस्थ, काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोकाट जनावरांमुळे वाहनचालकांची कसरत

सोलापूर : रस्त्यावरील मोकाट जनावरांमुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागते. असे चित्र सोलापूर शहरातील सर्वच चौकात सर्रासपणे दिसून येत आहे. सोलापूरच्या प्रवेशद्वारापासूनच शहरात मोकाट जनावरांचा वावर वाढल्याचे चित्र दिसून येते. शहरातील मोकाट जनावरांमुळे वाहतूक कोंडीची समस्या ही निर्माण होत आहे. शिवाय भर रस्त्यात अनेकदा या जनावरांची आपसातल्या भांडणांमुळे छोटे मोठे अपघात होऊन अनेकांना दुखापत अन् वाहनांचे नुकसान होत आहे. शहरातील सर्वच प्रमुख रस्त्यांवर जनावरे सर्रासपणे वावरताना दिसताहेत. त्यामुळे वाहनधारकांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागतोय. छत्रपती संभाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, रेल्वे स्टेशन चौक, सात रस्ता परिसर, गुरुनानक चौक, टिळक चौक, मधला मारुती, सम्राट चौक, रूपाभवानी रोड, मार्केट यार्ड परिसर, परिसर, अशोक चौक, विजापूर वेस, आसरा चौक, सैफुल, दमाणी नगर, लक्ष्मी मंडई परिसर आदी चौकात मोकाट जनावरे सर्रासपणे दिसून येतात. शहरात सध्या मोकाट जनावरांसोबतच मोकाट कुत्रे, गाढवांचाही वावर वाढला आहे. या जनावरांमुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सोलापूर शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न गंभीर आहे, आठ ते दहा ठिकाणी ही जनावरे रस्त्यातच ठाण मांडून बसलेली असतात. त्यामुळे वाहनधारकांना आपली वाहने चालविताना दुचाकीस्वारांना तर कधी चुकवत तर कधी वळसा मारूनच जावे लागते.



# उदगीर विधानसभेचा शरद पवारांचा युवा शिलेदार कोण..?

उदगीर :- सध्या माध्यमांमध्ये येणाऱ्या विधानसभेसाठी शरद पवार हे त्यांच्या पक्षाकडून वीस विधानसभा मतदार संघामध्ये पक्षाचे निष्ठावंत युवक उमेदवार देणार अशी चर्चा जोरकसपणे सुरू आहे. खऱ्या अर्थाने याचा उकल्लेख पक्षाचे प्रांत अध्यक्ष श्री जयंत पाटील हे सातत्याने करीत आहेत. आमचे विधानसभेमध्ये जास्तीत जास्त तरुण चेहरे असतील असा उल्लेख सातत्याने करत आहेत. शरद पवारांनी जाहीर केलेल्या २० विधानसभा मतदारसंघांमध्ये बारामती, इंदापूर, आष्टी, गेवराई, कर्जत जामखेड इत्यादी सह उदगीर या मतदारसंघाचा उल्लेख प्रामुख्याने पुढे येत आहे. हा उल्लेख पाहिल्यापासून सर्व उदगीरकराना उत्सुकता लागली आहे की शरद पवारांचा विधानसभेसाठी युवा शिलेदार कोण असेल..?

नुकताच शरद पवारांच्या पक्षाचे युवा आमदार रोहित पवार यांचा लातूर दौरा संपन्न झाला त्यावेळी साहेब निष्ठावंतांची रया गेली लक्ष द्या या मथळ्याचे एक पत्र लातूर मधील काही निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून त्यांना देण्यात आले त्यामळे या चर्चेला अजूनच उकळी फुटली आहे.'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार'पक्षाच्या वाट्याला महाविकास आघाडीमध्ये येणाऱ्या दोन विधानसभा मतदारसंघांपैकी एका मतदारसंघांमध्ये तरी निष्ठावंतला संधी देऊन पक्षनिष्ठा या कर्तव्याला महत्व देऊन शरद पवार नवी खेळी खेळून 'लंके 'पॅटर्न करतील यात नवल नहीं. खरें पाहता दोन्ही मतदारसंघांमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी आयात उमेदवार देऊ नये असा सर्व निष्ठावंत कार्यकर्त्यांचा आग्रह आहे . या सर्व घडामोडी पाहिल्या असता विधानसभेपर्यंत अनेक बदल पक्षाच्या निर्णयामध्ये होऊ शकतात असे दिसून येत आहे. नुकतेच माजी आमदार धर्माजी सोनकवडे , डॉ. अनिल कांबळे व माजी आमदार भालेराव यांचा 'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार 'पक्ष प्रवेश झाला आहे. माजी आमदार सुधाकर भालेराव यांचीउमेदवारी निश्चित मानली जात आहे. पण शरद पवारांनी नुकतीच युवकांना संधी देण्याची तयारी ही उत्सुकता वाढवणारी आहे. म्हणून शरद पवारांचा युवा चेहरा कोण हा प्रश्न उपस्थित झाला आहे.? या सर्व चर्चेमध्ये एक नवीन नाव वर येताना दिसत आहे माजी आमदार सुधाकर भालेराव यांचा यांचा पक्ष प्रवेश घेण्यामध्ये प्रामुख्याने ज्येष्ठ नेते बसवराज पाटील नागरकर, जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव मुळे यांच्यासह भालेरावांचे पाठीराखे व चांगले संबंध असणारे व त्यांना पक्षातआणण्यासाठी आग्रही असणारे निशांत वाघमारे हे होते. त्यामुळे ते या मतदारसंघाचा युवा चेहरा होऊ शकतात. कारण निशांत वाघमारे हे शरद पवारांच्या पक्षाच्या युवा आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष आहेत वीस वर्ष संघटनेत शरद पवारांवर कसलीही अपेक्षा न ठेवता निष्ठा ठेवून काम केले आहे. त्यांनी आतापर्यंत पक्ष संघटनेसाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे राष्ट्रवादी वाघाडीचे प्रदेश कार्याध्यक्ष चंदन पाटील यांच्यासह मराठवाड्यात पक्ष फुटीनंतर युवक संघटना मजबूत करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. युवकांचे विविध प्रश्न घेऊन ते सोडविण्यासाठी सातत्याने आघाडीवर असतात. पक्षातील शिबिरे व आंदोलने हा युवांचा विभाग पक्षाचा केडर तयार करतो त्याचे ते सध्या राज्य समन्वयक पण आहेत. तो विभाग सक्षम करण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे . पक्षाचा केडर तयार करण्यासाठीच्या प्रक्रियेमध्ये ते सातत्याने कार्यरत असतात त्यामुळे त्यांचे पक्षातील ज्येष्ठ नेत्यांची चांगले संबंध आहेत. मतदारसंघांमध्ये सगळ्यांशी चांगले संबंध ठेवून राहणारे व नवीन पक्ष प्रवेशात महत्वाची भूमिका बजावणारे. भालेरावांचे अलीकडील काळातील विश्वासू समजले जाणारे निशांत वाघमारे हे कदाचित शरद पवारांचे युवा शिलेदार ठरू शकतात त्यांच्या उमेदवारीच्या माध्यमातून मागासवर्गीय समाजात मातंग व नवबौद्ध अशी उभी फूट टाळून फक्त नवबौद्ध मता मध्ये वाटा घेत बेरजेचे गणित जुळवणे शक्य आहे. यामध्ये भालेराव पक्षात असल्यामुळे शरद पवार गटाचे सामाजिक समीकरणांमध्ये वर्चस्व राहू शकते. म्हणून उमेदवार म्हणून पक्षात निशांत वाघमारे यांचा सकारात्मक विचार केला जाऊ शकतो आणि पक्ष प्रवेश केलेल्या भालेरावांना सत्ता आल्यानंतर वरिष्ठ सभागृहामध्ये किंवा त्याहीपेक्षा वजनदार असणारी संधी मिळू शकते असे म्हटले जात आहे.भालेरावांनी गेल्या निवडणुकीमध्ये जी किंगमेकर ची भूमिका निभावली होती,तोच करिष्मा घडवून ते शरद पवारांचा विश्वास सार्थ ठरवतील असा अंदाज आहे.



## संपादकीय....

# सॅनिटरी नॅपकिन्सचा वापर योग्य?

१९७४ मध्ये 'अंकुर' चित्रपटातून सिनेसृष्टीत प्रवेश केलेल्या अभिनेत्री शबाना आझमी यांच्या कारकिर्दीचे चालू वर्ष हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या वर्षात 'अवनि' संस्थेच्या निमंत्रणावरून शबानाजी नुकत्याच कोल्हापुरात आल्या होत्या. कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी अनुराधा भोसले यांनी शबाना यांच्याशी गप्पांचा एक छोटेखानी कार्यक्रम घेतला. यावेळी काही डॉक्टर, काही आर्किटेक्टस् आणि विविध संघटनांच्या महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यावेळी लहान मुलांसाठी डायपर आणि मासिक पाळीच्या दिवसात महिला तसेच मुलींनी सॅनिटरी नॅपकिन्स वापरणे योग्य की अयोग्य?

मासिक पाळीच्या काळात महिला व मुली रजस्रावाच्या आवश्यक व्यवस्थापनासाठी जुन्या सुती साड्यांच्या कापडाचे तुकडे करून व त्यांच्या घड्या घालून ते तुकडे वापरत; पण १९ व्या शतकाच्या अखेरीस अशा पद्धतीचा कपडा पुन्हा पुन्हा धुऊन वापरण्याने जंतुसंसर्गाची शक्यता वाढते, असे चित्र समोर आले आणि त्यावर काय उपाय करता येईल, यावर जगभर विचार सुरू झाला. लहान मुले दुपट्यात लघवी झाली की, ओल जाणवून झोपेतून जागी होतात आणि रडतात. परिणामी, आई-वडिलांची झोपमोड होते याच्यावरही काही उपाय शोधला पाहिजे, असा प्रयत्न सुरू होताच यातूनच बेबी डायपर्स, अॅडल्ट डायपर्स आणि सॅनिटरी नॅपकिन्सची कल्पना पुढे आली. पाळीच्या दिवसांतही महिलांना व मुलींना सर्व दैनंदिन कामे करण्याचे स्वातंत्र्य, लहान मुलांना आणि त्यांच्या पालकांना निर्वेधपणाने झोप मिळणे अशा अनेक फायद्यांची जाहिरात सुरू झाली. डायपर्सचा खप वाढला. मध्यंतरी तर शाळांमध्ये मुलींसाठी सॅनिटरी पॅड पुरविणारी मशिन्स बसविण्याचे प्रयोगही झाले. मुलांना रात्रभर, दिवसभर डायपरमध्ये गुंडाळणे सुरू झाले. कोणते पॅड जास्तीत जास्त काळ वापरता येऊ शकते याच्याही जाहिराती झाल्या. प्रत्यक्षात याचा आरोग्याच्या व पर्यावरणाच्या दृष्टीने फायदा होतो आहे की तोटा, यावर आता विचार सुरू झाला आहे.

खूप रक्तस्राव झाला, तरी तो पॅड शोषून घेतात अशा सॅनिटरी पॅडचा खप वाढला; परंतु अलीकडच्या काही अभ्यासांमध्ये सॅनिटरी पॅड बनवताना त्यामध्ये डायऑक्सिन, तसेच सुपर अॅबसॉर्बंट पॉलिमर यांचा आणि काही कीटकनाशके व कृत्रिम सुगंधी द्रव्ये यांचा उपयोग केला जातो. याचा दुष्परिणाम मुली व महिला यांच्या प्रजनन क्षमतेवर होणे, जननेंद्रियांचा कॅन्सर होणे यासह अनेक प्रकारचा त्रास मुली व महिलांना भोगावा लागतो असा संशय व्यक्त केला गेला आहे. लहान मुलांनाही मूत्रपिंडाचा काही विकार असेल, तर सतत डायपर घालण्याने तो लक्षात येत नाही. पॅड सुरक्षितपणे वापरायचे, तर त्यासाठी ती दिवसातून किमान तीन-चार वेळा बदलावी लागतात. मध्यम आर्थिक स्थितीतील कुटुंबांमधील मुलींना व महिलांना ही बाब आर्थिकदृष्ट्या परवडतेच असे नाही. लहान मुलांनाही डायपर खूप वेळ घालून ठेवले, तर व-ण उठण्यासारखे त्रास होऊ शकतात.

आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पर्यावरणाचा! वापरात आणली जाणारी सॅनिटरी पॅड व डायपर बायोडिग्रेडेबल असतातच असे नाही. त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जात नाही. उदाहरणार्थ, सॅनिटरी पॅड कचरापेटीत टाकण्याची लाज वाटते म्हणून अनेकदा स्त्रिया पॅड शौचालयातून फ्लश करण्याचा प्रयत्न करतात. परिणामी, अनेकदा तुंबलेल्या गटारी ऑणि ड्रेनेज लाईनमध्ये मोठ्या प्रमाणावर सॅनिटरी पॅड आढळतात. शबाना आझमींच्या समवेत झालेल्या चर्चेच्या वेळी काही महिला डॉक्टरनी स्पष्ट मत नोंदवले. पूर्वी सुती साड्यांच्या घड्या पॅडप्रमाणे वापरल्या जात आणि त्यामुळे जंतुसंसर्ग होत असे, हे खरे; पण त्याचे कारण वेगळे आहे.

# निवडणुकीपुढे शेतकरी आत्महत्येचा प्रश्न नगण्य?

देशात सगळ्यात जास्त शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात, त्यातही विदर्भात आणि त्यातही अमरावती विभागात होतात, असे आकडेवारी सांगते. पण तेथील शेती प्रश्नांकडे कोणतेही सरकार आवश्यक गांभीर्याने बघत नाही. निवडणुका आल्या की तेवढी सगळ्यांना जाग येते. आज भारतात आपण औद्योगिक क्षेत्राची आघाडी आणि शेती क्षेत्राची पीछेहाट अशा विसंगतीत जगत आहोत. औद्योगिक क्षेत्रात भरमसाट वाढ होत आहे, आंतरराष्ट्रीय नाणे निधीने २०२४-२५ चा भारताचा विकासदर पूर्वी व्यक्त केलेल्या ६.८ टक्क्यांवरून वाढवून सात टक्के केला आहे. शेअर बाजारात शेअरच्या निर्देशांकाने प्रथमच शिखरावर पोहोचून ८१ हजार अंकांची पातळी पार केली आहे. समभाग भांडवल बाजारात विदेशी गुंतवणुकीचा ओघ वाढत आहे. तंत्रकुशल तरुण वर्ग आपल्या उच्च पगाराच्या आधारावर भांडवल बाजारात गुंतवणूक करीत आहे. नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या मे २०२४ च्या आकडेवारीनुसार देशातील १० गुंतवणूकदारांपैकी चार म्हणजे ४० टक्के गुंतवणूकदार ३० वर्षे वयाच्या खालील आहेत आणि ४० वर्षे वयाच्या आतील गुंतवणूकदारांचा एकूण गुंतवणुकीतील हिस्सा ७० टक्के आहे. तरुणांचे प्रमाण विशेष करून २०१८ पासून वाढत आता त्या वर्षापेक्षा दुप्पट झाले आहे. ही सगळी औद्योगिक क्षेत्रातील चंगळ आहे. आपण शेतीकडे पाहू गेल्यास तेथील वृद्धीदर २०१७-१८ च्या ६.६ टक्क्यांवरून २०१८-१९ मध्ये २.१ पर्यंत घसरला; २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये हा विकासदर अनुक्रमे ३.३ आणि ३.१ टक्क्यांपर्यंत कमी झाला. २०२३-२४ मध्ये कृषी वृद्धीदर १.८ टक्क्यापर्यंत कमी झाला. यात सिंचन असलेल्या प्रदेशांचा हिस्सा बाजू केल्यास कोरडवाहू प्रदेशांचे योगदान नाममात्र शिल्लक राहते. अशा प्रदेशांपैकी एक प्रदेश विदर्भ आहे. विदर्भातील शेतीच्या हवामानानुसार दोन भाग आहेत: प्रथम वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर म्हणजे प्रशासकीय नागपूर विभाग. हा धान (तांदूळ) पट्टा आहे. त्याला पावसाळ्यात पश्चिमेकडून अरबी समुद्राचा आणि हिवाळ्यात पूर्वेकडून बंगालच्या उपसागराकडून पाऊस मिळतो. त्यातून दोनदा पिके येतात म्हणून या भागात शेतीचे इतर प्रश्न असले तरी शेतकरी आत्महत्या होत नाहीत. दुसरा प्रशासकीय विभाग यवतमाळ, वाशीम, बुलढाणा, अकोला आणि अमरावती जिल्ह्याचा-अमरावती विभाग किंवा वऱ्हाड (बेरार). याला प्रामुख्याने मान्सूनचा पश्चिमेकडील पाऊस मिळतो. त्यावर कापूस, सोयाबीन ही खरिपाची पिके एकदाच येतात. कापूस ऑक्टोबरपासून फेब्रुवारीपर्यंत वेचतच राहावा लागतो. म्हणून एकच पीक येते. वऱ्हाडातील जमीन काळी कसदार. या मातीचे शास्त्रीय नावच ब्लॅक कॉटन सॉइल असे आहे. ब्रिटिश गॅझेटियरनुसार हा कापूस गंगेवर नेऊन ढाक्याला पाठवला जाई व त्यापासून ढाक्याची मलमल बने. ब्रिटिशांनी भारतातील सर्वात जास्त दरएकरी जमीन वऱ्हाडवर महसूल आकारून शोषण केले. १८६५ मध्ये अमेरिकेत गुलामगिरीच्या प्रश्नावर यादवी युद्ध झाल्यामुळे तेथील कापूस ब्रिटिश कापड गिरण्यांना मिळणे बंद झाले. मग कापूस सातत्याने मिळत राहावा म्हणून वऱ्हाड (बेरार) प्रदेश सगळ्या साम्राज्यात सोयीचा वाटला व त्यांनी वऱ्हाडच्या कापसाच्या लागवड-प्रक्रिया-परिवहन आणि निर्यात यासाठी भरपूर खर्च केला. अमेरिकेन कापूस ब्रिटनला पुन्हा मिळेपर्यंत वऱ्हाडातील कापसाच्या किमती चौपटीने वाढून निर्यातीद्वारे तो वऱ्हाडचा सुवर्णकाळ 'वऱ्हाड आणि सोन्याची कुऱ्हाड' बनला. ते युद्ध संपल्यानंतर वऱ्हाडातील कापसाचा, शेतीचा आणि शेतकऱ्यांचा जो ऱ्हास सुरू झाला तो आता २०२४ पर्यंत! स्वातंत्र्य, द्विभाषिक मुंबई आणि महाराष्ट्र १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर १९५६ मध्ये विदर्भ द्विभाषिक मुंबईत आला आणि १९६० मध्ये महाराष्ट्रात सामील केला गेला. विदर्भातील सिंचन निर्माण करण्याचा प्रयत्न, राज्यातला एक मोठा कापूस प्रदेश म्हणून झालाच नाही. १९८४ च्या दांडेकर समितीच्या अहवालातही महाराष्ट्रात सगळ्यात जास्त अनुशेष विदर्भाचा आणि त्यात सगळ्यात जास्त अनुशेष अमरावती विभागातील सिंचनाचा. तो अहवालही तत्कालीन राज्य शासनाने स्वीकारला नाही. तशीच वाट २००० च्या भुजंगराव कुलकर्णी समितीच्या अहवालाची लागली. २००३-०४ पासून तत्कालीन राज्यपालांनी तीन वर्षांत अनुशेष भरून काढण्यासाठी विदर्भाला जास्तीचे आवंटन केले. राज्य सरकारने ते निर्देश दुर्लक्षित करून त्या रकमा तीन वर्षांपर्यंत पश्चिम महाराष्ट्राकडे वळवल्या. २००६ पर्यंत विदर्भात शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्या होत्या. त्यासंदर्भात शेतकरी नेत्यांच्या विनंतीला मान देऊन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग विदर्भात (वायफळ-पुलगावला) जून २००६ मध्ये आले. त्यांनी परिस्थिती पाहून रोजगार हमीची योजना देशभर लावण्याचा निर्णय घेतला; त्यांच्या सूचनेवरून अमरावती विभागाची स्थिती जाणून अहवाल देण्यासाठी योजना आयोगाच्या एक महिला अर्थशास्त्रज्ञ डॉ. आदर्श मिश्रा यांच्या अध्यक्षतेत एक समिती नेमली. त्या समितीने स्पष्टपणे म्हटले की अमरावती विभागाला पुरेसा निधी न मिळण्यात राजकीय नेते व संबंधित प्रशासन यांच्यात संगनमत दिसते. तेव्हाच्या महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांनी त्या समितीस सांगितले की आमच्याजवळ पुरेसा पैसा नाही. विदर्भासाठी निधी केंद्र सरकारने द्यावा. वास्तविक पाहता संविधान अनु. ३७१ (२) चा व नागपूर कराराचा अर्थ असा आहे की राज्य सरकारजवळ जेवढा विकास निधी असेल (कमी असो की जास्त) तो नेहमीच लोकसंख्येच्या प्रमाणात वाटला जावा. परंतु १९५६ पासूनच विदर्भातील शेतीकडे दुर्लक्ष होत आहे व ते चालूच आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेल्या २४ वर्षांत (२००१ पासून) अमरावती विभागात (पश्चिम विदर्भ) एकूण २७,२३४ आत्महत्या झाल्याची नोंद आहे. आतापर्यंत देशात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या महाराष्ट्र राज्यात होतात असे म्हटले जाते. प्रत्यक्षात त्या पश्चिम महाराष्ट्रात नाही तर अमरावती विभागात होतात व तितकेच परिवार उघड्यावर पडतात हे भीषण सत्य नजरेआड होता कामा नये. हवामान बदलामुळे पावसाची अनिश्चितता, समाधानकारक किमान आधारभूत किंमत शासनाकडून न मिळणे, आदानांच्या (बी-बियाणे-खते, कीटकनाशके) अनियंत्रित किमतींमुळे मुळातच उत्पादन तोट्यात चालणे, शेती व कुटुंब चालवण्याकरिता त्याने सावकार व मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून बरेच वेळा आठवड्याला २० टक्के म्हणजे वर्षाला १०४ टक्के व्याजाच्या कल्पनातीत दराने कर्ज काढणे आणि ते फेडण्याचे सर्व मार्ग बंद असल्यामुळे त्याने आत्महत्या करणे, ही साखळी चालू आहे. ब्रिटिशांच्या वेळेपासून

# एससी, एसटी आरक्षण:उपवर्गीकरण, क्रीमी लेअर लागू करणे: सर्वोच्च न्यायालय निर्णय

सर्वोच्च न्यायालयाच्या ७ न्यायाधीशाच्या खंडपीठाने चिन्नया प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या निर्णया विरुद्ध निर्णय दिला,त्या अनुसार :१) आरक्षण देण्यासाठी अनुसूचित जातीमधे उपवर्गीकरण करण्यास मान्यता दिली.२)अनुसूचित जाती मधेही क्रीमी लेअर लागू करण्याचा आग्रह. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०१.०८.२०२४ ला निर्णय दिला आहे. ५०० पानाच्या वर हा निर्णय आहे,संपूर्ण निर्णयाची जानाकारी आल्यावर आणखी भाष्य करता येईल. चिन्नय्या प्रकरणात उच्च न्यायालयाने मान्य केले आहे की संविधान अनुच्छेद ३४१ अनुसार अनुसूचित जाती हा एकसंघ गट आहे व वर्गामधे विभागले जाऊ शकत नाही परंतु सूप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने एकसंघ गट मानण्यास नकार दिला व वर्गामधे विभागले जाऊ शकते असा निर्णय दिला. क्रीमी लेअर चा चर्चेचा विषयच नव्हता त्यामुळे क्रीमी लेअर विषयावर सूप्रीम कोर्टाच्या निर्णयावर आश्चर्य वाटते. सूप्रीम कोर्टाचा निर्णय जाती जाती मधे वर्ग संघर्षाला बढावा देईल,व हा एकप्रकारे आरक्षण संपविण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल ठरेल.या निर्णयामुळे मनुवादी विचारसरणीचे लोक व संघटना जे जातीय आधारित आरक्षणाला विरोध करतात त्यांना या निर्णयामुळे बळ मिळेल यात शंका नाही.

अनुसूचित जातीमधे उपवर्गीकरण कसे करणार,त्याचा ठोस आधार काय हे अजून स्पष्ट झाले नाही. वर्तमान केंद्रीय सरकार हे जातिगत जनगणना करण्यास अनुकूल नाही आहे तर उपवर्गीकरण कसे होईल हे एक कोडेच आहे. प्रश्न राजकीय आरक्षणाचा पण आहे, इथे अनुसूचित जातीमधे बहुसंख्यक असलेल्या जातींना पर्याप्त व खरे प्रतिनिधित्व मिळत नाही याचा सर्वोच्च न्यायालयाने सज्ञान घ्यायला पाहीजे.लोकतंत्र मधे जनतेचे खरे व जागरुक प्रतिनिधी हे गर्भित आहे मग आरक्षित वर्गाचे प्रतिनिधी आरक्षित लोकांनीच निवडले पाहिजेत याचाही विचार झाला पाहिजे.समीक्षा करायाची तर पूर्ण करा अगदी पुणे करारा पासुन. अनुसूचित जाती मधे अनेक जाती आहेत जसे चाम्भार,भंगी,महार इत्यादी या जातीमधे सुद्धा अनेक पोट जाती आहेत. जाती मधे उपजाती आणी त्याचातही पोटजाती अशी समाजरचना असलेल्या देशात वर्गीकरणाची समस्या निर्माण करुन वर्ग संघर्षाला निमंत्रण देने योग्य आहे काय याचा विचार करावा लागेल. संविधान अनुच्छेद ३४१ अनुसूचित जातीतील जातींना एकसंघ मानतो व त्या आधारावर गेल्या ७० वर्षापासुन आरक्षण प्रणालीची अमलबजावणी होत आहे याला छेद देने घातक ठरू शकते. ही समस्या निर्माण होण्याचे कारण म्हणजे अनुसूचित जातीतील काही लोकांना असा भ्रम झाला की आरक्षणाचा लाभ हा काही विशेष जातींनाच झाला किंवा लाटला आणी याला हवा देण्याचे काम मनुवाद्यांनी केले.

अनुसूचित जाती मधीलच काही जाती नेत्यांना शिक्षण व ज्ञानच्या अभावी असे वाटायाला लागले की आरक्षण हे अप्रत्यक्षपणे काही विशेष जाती पुरतेच मर्यादीत आहे. अनुसूचित जाती मधे ऊल्लेखित सर्व जातीसाठी समान संधी होत्या व आहेत मग सामाजिक स्तर सारखा असूनही विशेष जातींनीच का प्रगती केली??? याचा विचार केंव्हा करणार आहात?? ज्या जातींनी अंधश्रद्धा,चमत्कार,कर्मकांड,बुवाबाजी,दैववाद याला मूठमाती देऊन शिक्षणाला महत्व दिले, वेळप्रसंगी उपासमार सहन करून, अनेक त्रास भोगून शिक्षण पूर्ण केले व प्रगती केली त्यांचा दोष आहे काय?? ज्या जातीनी अंधश्रद्धा,कर्मकांड,धार्मिक आडम्बर, परंपरागत निकृष्ट व्यवसाय या मधुन बाहेर निघून शिक्षणाला महत्व दिले नाही,न्यूनतम शैक्षणीक योग्यता प्राप्त करू शकले नाही ते शिक्षणात पुढे येऊन प्रगती करणाऱ्या जातींना दोष देऊ शकत नाहीत आणी त्यांच्या अवनतिला तेच जवाबदार आहेत. जरी आरक्षण आहे तरी आवश्यक शिक्षण व परीक्षेत न्यूनतम योग्यता हे आवश्यक आहेच व या अभावी आरक्षणाचा पूर्ण कोटा भरल्या जात नाही व बैकलॉग राहतो हे सर्वविदित असतांनाही आरक्षणाचा लाभ काही विशेष जातींनीच लाटला असा भ्रम ठेवणे किंवा विश्वास करने बालिशपणाचे व मूर्खपणाचे लक्षण आहे. उपवर्गीकरण करूनही ही समस्या मिटणार नाही कारण आवश्यक शिक्षण व न्यूनतम योग्यतेच्या अभावी कोटा भरलाच जाणार नाही व कालांतराने याचा लाभ सामान्य वर्ग/ सवर्णांना मिळेल. अनुसूचित जाती/जनजातीतील सर्व जातींनी एकसंघ राहून अंधश्रद्धा,चमत्कार,कर्मकांड,धार्मिक आडम्बर नाकारून वैज्ञानिक शिक्षणाला महत्व देण्याची गरज आहे सोबतच निजी क्षेत्रात सुद्धा आरक्षण लागू करण्याची व आरक्षणाचा कायदा बनविण्याची नितांत गरज आहे आणी हेच स्थाई समाधान आहे.



अनुसूचित जाती, जनजाति चे आरक्षण हे आर्थिक आधारावर नसुन सामाजिक शोषण,उत्पीडन या तत्वावर आहे, गरीबी हटाव अंतर्गत हे आरक्षण नाही आहे. अनुसूचित जाती,जनजातीचे आरक्षण हे सामाजिक अन्याय,अत्याचार,शोषण,उत्पीडन झालेल्या समाजाचे सत्ता,प्रशासनमधे प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचे माध्यम आहे. क्रीमी लेअर अवधारणा लागू करने म्हणजे मूळ उद्देशापासून दुर जाने किंवा भटकने होय. यामुळे निश्चितच जाती आधारावर आरक्षण समाप्त करण्यास पाठबळ मिळेल व मनुवादी विचारसरणी वाले लोकांचे लंबित व इच्छित ध्येय पूर्ण होईल. क्रीमी लेअर लागू झाली तर क्रीमी लेअरवाले यांना सामान्य श्रेणीत ही जागा मिळणार नाही कारण कितीही योग्य असले तरी साक्षात्कार मधे गाडले जातील हे कटुसत्य सर्वविदित आहे, दुर्दैव म्हणजे याचे सामाजिक भान असलेले विद्वान न्यायाधीश पूरजोर समर्थन करित आहेत. क्रीमी लेअर लागू झाले की शिक्षण व न्यूनतम योग्यता अभावी आरक्षित कोटा पूर्णपणे भरल्या जाणार नाही, सतत बैकलॉग निर्माण होईल व कालांतराने अप्रत्यक्ष लाभ सामान्य श्रेणी/सवर्ण वर्गास होईल. म्हणजे अनुसूचित जाती मधे दोघांचेही (अर्थात क्रीमी लेअर व नॉन क्रीमी लेअर) नुकसान होईल.

********

लक्ष्मण बोरकर : ७७०९३ १८६०७,नागपूर.
सेवानिवृत वरिष्ट प्रबंधक बँक ऑफ इंडिया नागपूर .

# निसर्गाचे सौंदर्य, सामर्थ्य, सर्वोत्कृष्ट निर्मिती पहा. आणि नियमाचे पालन करा.

जगात एकमेव महामानव तथागत गौतम बुद्ध होऊन गेले त्यांनी स्वयम प्रकाशित होण्यास सांगितले. मानवाला मानवा सारखे वागण्याची शिकवण दिली.सुख,दुख हे कायम स्वरूपी टिकणारे नाही. ते निसर्ग नियमाने येत व जात राहील.ज्या प्रमाणे पावसाळ्या,नंतर हिवाळा.हिवाळ्या नंतर उन्हाळा. आणि उन्हाळ्या नंतर पावसाळा हा येत राहणार त्यांचा क्रम बदलविण्याची ताकद कोणातही नव्हती आणि नाही.त्यासाठी उपास तपास,नवस,यज्ञ,महा पूजा अर्चा पायी पदयात्रा काही करा काही होणार नाही.पण निसर्गाच्या नियमाचे पालन करा नाहीतर यम म्हणजे दुखद मृत्यू,अपघाती मृत्यू हा ठरलेला आहे.म्हणूनच निसर्गाचे सौंदर्य, सामर्थ्य,सर्वोत्कृष्ट निर्मिती पहा. आणि नियमाचे पालन विचार करून आनंदाने जगा इतरांना जगवा.

त्यासाठी या आठ साध्या सोप्या नियमाचे पालन करा.मग तुमच्या एवढा सुखी,समाधानी आणि श्रीमंत कोणी नसेल.१) श्रीमंत होण्यासाठी तुमच्या मुलांना शिकवू नका तर त्यांना आनंदी राहण्यासाठी शिकवा ज्यामुळे मोठ झाल्यावर त्यांना वस्तूंचं महत्त्व आणि मूल्य कळेल किंमत नाही. २) तुमचं जेवण तुम्ही तुमचं औषध समजून घ्या. नाहीतर औषधच तुम्हाला जेवण म्हणून घ्यावं लागेल.जगण्यासाठी खा,खाण्यासाठी जगु नका.३) जी व्यक्ती तुमच्यावर प्रेम करते ती तुम्हाला कधीही सोडून जाणार नाही. कारण तुम्हाला सोडून जाण्याची शंभर जरी कारणं असली तरीही त्या व्यक्तीला एकच कारण असं सापडेल की ज्यामुळे ती व्यक्ती तुम्हाला सोडून जाणार नाही. ४) मानव असणे आणि मानवता असणे या मध्ये खूप फरक आहे.तो समजून घ्यावा. ५) ज्या वेळी तुमचा जन्म होतो त्यावेळी तुमच्या वर प्रेम केलं जाते. आणि ज्यावेळी तुम्ही मृत व्हाल त्या वेळी ही तुमच्या वर प्रेम केलं जाईल. ही समजूत मनातून काढून टाका.मृत झाल्यावर आठ तासापेक्षा जास्त तुम्ही कितीही प्रिय असला तरी तुम्हाला घरात ठेवले जाणार नाही.६) तुम्हाला वेगात चालायच असेल तर एकटे चाला पण दूरवर चालत जावे लागणार असेल तर सर्वांना सोबत घेऊन एकत्र चाला.७) जगातील सर्वात चांगले सहा डॉक्टर कायम लक्षात ठेवा.१) सूर्यप्रकाश २) विश्रांती ३) व्यायाम ४) योग्य आहार ५) आत्मविश्वास ६) मित्र.आयुष्याच्या सगळ्या टप्प्यांवर यांना सांभाळा आणि आरोग्यदायी जीवन जगाल.८) जेव्हा तुम्ही चंद्र पाहता त्यावेळी तुम्ही निसर्गाचे सौंदर्य पाहता,जेव्हा तुम्ही सूर्य पाहता त्या वेळी तुम्ही निसर्गचं सामर्थ्य पाहता,ज्यावेळी तुम्ही आरसा पाहता त्यावेळी तुम्ही निसर्गाची सर्वोत्कृष्ट निर्मिती पाहता.म्हणून स्वतःवर विश्वास ठेवा!आणि स्वयम प्रकाशित व्हा.



आपण सगळे जण प्रवासी आहोत आपला अंतिम मुक्काम आधीच ठरलेला आहे हे जीवन ही एक सहल समजून आनंद घ्या.तुमचे अनेक गुण पाहून अनेक लोक तुमच्यावर प्रेम करतील पण आयुष्यात त्यालाच स्थान द्या,जे तुमच्यातले दोष पाहूनही तुमची साथ सोडणार नाही.सुंदर काय असतं.कितीही गैरसमज झाले,किंवा कितीही राग आला तरीही,थोड्या अवधीमध्ये मनापासून सर्व माफ करून पुन्हा पूर्ववत होते ते नाते सुंदर असते.पावसाळ्यात तुम्ही कितीही जपून चला,शिंतोडे उडवणारी वाहने येतात आणि आपल्या अंगावर शिंतोडे उडवून जातात.आयुष्यही असंच असतं. तुम्ही कितीही सुस्पष्ट, प्रामाणिकपणे वागा शिंतोडे उडवणारे लोक येतात शिंतोडे उडवतात आणि निघून जातात.फक्त त्या शिंतोड्याने आपला प्रवास आपणच थांबवायचा नसतो.एकमेकांना धीर देणे हे सुद्धा अत्यावश्यक सेवेतच मोडतं.हे सुद्धा कायम लक्षात ठेवा. मला कोणाची गरज नाही. हे मनातून काढून टाका.

ठखउक असणं म्हणजे काय ?
ठखउक शब्दामधला
'ठ' हा ठशश्ररींळेपीहळि चा,
'ख' हा खपलोश चा,
'उ' हा उहरीरलींशी चा आणि
'र्क' हा क्शरश्रींह चा.

नातेसंबंध,पैसा,चारित्र्य आणि आरोग्य हे चारही स्तंभ मजबूत आणि संतुलित असणे.म्हणजे ठखउक असणं.यातला एक स्तंभ जरी डळमळीत असेल किंवा मजबूत असूनही संतुलित नसेल तरी बाकी सारं असूनही आयुष्य विकलांग आहे.चला.एकमेकाना थळीह करूया आणि सगळेच जण ठखउक होण्याचा प्रयत्न करूया...! जिवन खुप सुंदर आहे फक्त तसं जगायला हवं..!.काळजी घ्या.तुमचे दिवस सुखाचे जावोत.आयुष्य खूप सुंदर आहे. जी गोष्ट तुम्हाला आव्हान देते, तीच गोष्ट तुमच्यात बदल घडवू शकते,भले यशस्वी होण्याची खात्री नसेल,परंतु संघर्ष करण्याची प्रेरणा नक्कीच असली पाहिजे.अनुभव हा मोफत मिळत नसतो. त्यासाठी कधी वेळ,कधी किंमत,तर कधी आयुष्य खर्च करावं लागतं.आणि संघर्ष करावा लागतो. त्याशिवाय फुकटात काहीच मिळत नाही.अति विचारामुळे आपण आपल्या आयुष्यात काल्पनिक समस्या निर्माण करतो,ज्या अस्तित्वातच नसतात. म्हणून समजूतदारपणा हा ज्ञानापेक्षाही खूप महत्त्वाचा असतो.

सागर रामभाऊ तायडे - ९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.

# वंचित बहुजन आघाडीच्या धडक मोर्चामुळे नवी मुंबई महानगर पालिकेला आली जाग

प्रलंबित सारसोळे बसडेपो चौक येथील मान्यताप्राप्त आसलेल्या अशोकस्तंभ संविधान शिल्पकृती साकारण्यात विलंब का..? नवी मुंबई महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त : सुनील पवार यांना पुन्हा विनंती पत्र

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनाक: २ आगस्ट २०२४ रोजी वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : दिलिप (भाई) बंदीचोडे तसेच सिवुडस विभाग अध्यक्ष: अँड. उमेश हातेकर यांच्या नेतृत्वात नवी मुंबई महानगर पालिकेवर धडक मोर्चा काढण्यात आला सिवूडस सेक्टर – ५० जुने येथील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९३ येथून मोर्चाला सुरुवात करून तो मोर्चा नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयावर धडखला. सदर मोर्चा नवी मुंबईतील उपस्थित पालकांनी व नागरिकांच्या घोषणेने सारा परिसर दणाणून गेला परत करा परत करा पालकांचे पैसे परत करा..!, श्रीमंत आमची पालिका मग विद्यार्थ्यांचे हाल का..? प्राप्त करा प्राप्त करा शाळेला दिल्ली मंडळाची मान्यता प्राप्त करा..! विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करा..! इत्यादी घोषणेने सारा परिसर दणाणून गेला. तद्नंतर नवी मुंबई महानगरपालिकेने या मोर्चाची दखल घेऊन वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाला नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त : सुनील पवार व संघरत्न खिल्लारे यांनी बोलावून घेतले व शिष्टमंडळास अश्वासनदिले की, नमुमपा लवकरच विद्यार्थ्यांना शालेय वस्तूचे वाटप करणार आहे. व तसेच (सी.बी.एस.ई) शाळेला दिल्ली मंडळाची मान्यता मिळवण्यासाठी पालिका लवकरच प्रयत्न करणार आहे. आणि पालकांचे पैसे लवकरच पालकांना त्यांच्या बँक खात्यात पाठवणार असल्याचे शिक्षण विभागाचे उप आयुक्त : संघरत्न खिल्लारे यांनी लेखी पत्राद्वारे आश्वासन दिले या प्रसंगी शिष्ट मंडळात वंचित बहुजन आघाडीचे विभाग अध्यक्ष अँड. उमेश हातेकर, जिल्हाध्यक्ष श्री. दिलीप (भाई) बंदीचोडे, महिला जिल्हाध्यक्ष : शिल्पाताई रणदिवे, राहुल जाधव, बेलापूर तालुका माजी उपाध्यक्ष : कल्याणराव हनवते






यांनी मागील दोन वर्षांपासून प्रलंबित आसलेले सारसोळे बस डेपो चौक येथील मान्यता आगदी मागील आयुक्त अभिजीत बांगर ते राजेश नार्वेकर यांनी मान्यता दिलेली असताना सारसोळे चौकात अशोकस्तंभ संविधान शिल्कृती देखावा साकारण्यास महानगरपालिका विलंब का ? करते (होतो) याचे सह आनेक मागण्याचे निवेदन नमुमपा अतिरिक्त आयुक्त : सुनील पवार साहेब यांना देण्यात आले. या धडक मोर्चात वंचित बहुजन अघाडी नवी मुंबईतील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते ऐरोली ता. अध्यक्ष संतोष जाधव, महासचिव राजेश भालेराव, सचिव विशाल टोणगे, राजेंद्र बनसोडे, विक्रांत चिकने, किशोर अवसरमल, सुनील भोले, संजय झनके, अँड. निकोसे, गौतम चव्हाण, राहुल शिरसाट, हेमंत दिवेकर, मल्लिनाथ सोनकांबळे, सतिश भोसले, आणि नवी मुंबई जिल्ह्यातील सर्व वार्ड विभाग तालुका आणि जिल्हा कमिटी, असंख्य कार्यकर्ते व अजी माजी पदाधीकारी आणि महीला कार्यकर्त्या यांनी भरपावसात उपस्थित राहून मोर्चा यशस्वी केला.

# लाचखोर तलाठ्याला १७ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडी

परभणी : बँकेच्या कामासाठी जमिनीचा फेरफार करून सातबारावर नोंद घेण्यासाठी ८० हजारांची मागणी करून पाहिला हप्ता म्हणून ४० हजार रुपये लाच स्विकारताना फुलकळस सज्ञा तलाठी दत्ता संतराम होणमाने(४७) यास गुरूवारी रंगेहाथ पकडण्यात आले होते. तलाठी होणमाने यास दि. २ ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर करण्यात आले असताना न्यायालयाने १ दिवसाची पोलिस कोठडी सुनावली होती.



त्यानंतर पोलिसांनी पुन्हा तलाठी होणमाने यास न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १७ ऑगस्टपर्यंत तलाठी होणमाने यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तलाठी होणमाने याने तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे फुलकळस शिवारातील २ गुंठे जमिनीचा फेरफार करून सातबारावर नोंद घेण्यासाठी प्रति गुंठा ४० हजार रुपये याप्रमाणे ८० हजार रुपयाची मागणी केली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी दि. २९ जुलै रोजी एसीबी परभणी येथे त्याबाबत तक्रार दिली होती. त्यानंतर गुरुवारी पंचासमक्ष तलाठी होणमाने यास एसीबी पथकाने ४० हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले होते.

# गरोदरपणात सर्दी, खोकला झाल्यास काय करावं? मसाबा गुप्ताचा 'हा' घरगुती उपाय तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल का? तज्ज्ञांचे मत जाणून घ्या



बॉलीवूड अभिनेत्री नीना गुप्ता यांची मुलगी मसाबा गुप्ता एक प्रसिद्ध फॅशन डिझायनर आहे. एप्रिल महिन्यात मसाबा गुप्ता व तिचा पती सत्यदीप मिश्रा यांनी ते दोघे आई–बाबा होणार असल्याची गोड बातमी सोशल मीडियावर पोस्ट लिहित सांगितली होती. तर मसाबा गुप्ता देसी जुगाड व हॅकची फॅन आहे. तर गर्भवती मसाबा गुप्ताने काही दिवसांपूर्वी असे सांगितले की, तिला खोकला, सर्दी, रक्तसंचय ही सर्व लक्षणे बरे करण्यासाठी ओवा गरम करून तो रुमालात घालून, त्याचा बटवा बनवून त्याचा वास घ्यायला आवडते. आजीबाईंचा बटवा हे तुम्ही आजवर अनेकदा ऐकलं असेल. आई–आजीच्या जुन्या युक्त्यांना आपण कधीच नाही म्हणणार नाही किंवा त्यावर अविश्वासही दाखवणार नाही. पण, या हेल्थ हॅकबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी द इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांशी संवाद साधला आणि हा घरगुती उपाय वा जुगाड गर्भवती महिलांसाठी सुरक्षित आहे की नाही हे शोधून काढले. ओव्यामध्ये थायमॉल असते, ज्यामध्ये दाहक–विरोधी आणि प्रतिजैविक गुणधर्म असतात. थायमॉल तुमचे नाक साफ करण्यास, घशाची जळजळ कमी करण्यास मदत करते. तर होय, ओवा गरम करून तो रुमालात घालून, त्याचा बटवा बनवून वास घेणे सर्दी आणि खोकल्याची लक्षणे कमी होण्यास मदत होते; असे पोषणतज्ज्ञ ईशा लाल यांनी सांगितले आहे. आयुर्वेदिकतज्ज्ञ डॉक्टर अंशु वात्स्यायन म्हणाले की, हा ओव्याचा बटवा शरीर व डोकेदुखी बरं करू शकते. बाळंतपणानंतर हा उपाय महिलांसाठी अधिक फायदेशीर ठरू शकतो. हा बटवा तयार करण्यासाठी तुम्ही ओव्याच्या बिया तव्यावर भाजून किंवा कोमट पाण्यात भिजवून घेऊ शकता. बटवा बनवण्यासाठी ओवा अर्धा चमचापेक्षा जास्त घेऊ नका; अशी त्यांनी शिफारस केली आहे. ओव्याचा बटवा गर्भवती महिलांसाठी सुरक्षित आहे का? आयुर्वेदिकतज्ज्ञ डॉक्टर अंशु वात्स्यायन आणि पोषणतज्ज्ञ ईशा लाल या दोघांनीही मान्य केले की, ओव्याचा बटवा गर्भवती महिलांसाठी सुरक्षित आहे. जर तुम्हाला गर्भधारणेदरम्यान इंग्रजी औषधे खायची नसतील आणि त्याचे दुष्परिणाम सहन करायचे नसतील, तर ओव्याचा बटवा तुम्हाला ठराविक औषधांशी संबंधित होणाऱ्या दुष्परिणामांपासून आराम देईल. पण, तुम्हाला खात्री नसल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे, त्यांच्याकडून तपासून घेणे केव्हाही उत्तम ठरेल; असे पोषणतज्ज्ञ ईशा लाल म्हणाल्या आहेत. ओव्याचे आरोग्यदायी फायदे कोणते आहेत? पचनास मदत : ओव्यामध्ये थायमॉल नावाचे संयुग असते, जे गॅस्ट्रिक रस स्राव करते, अपचन आणि ब्लोटिंग (पोट फुगण्याची समस्या) कमी करण्यास मदत करते. श्वसनास आराम : ओव्याचे प्रतिजैविक गुणधर्म सर्दी, खोकला आणि रक्तसंचय कमी करण्यास मदत करतात. वेदनांपासून त्वरित आराम : ओवा त्याच्या दाहक–विरोधी गुणधर्मांमुळे सांधेदुखी, स्नायू, पायात पेटके येणे शांत करू शकते. अँटीमायक्रोबिल : ओव्यातील थायमॉल संइन्फेक्शनचा सामना करते आणि रोगप्रतिकारकशक्ती वाढवते. गर्भवती महिला हे किती वेळा वापरू शकतात? पोषणतज्ज्ञ ईशा लाल यांनी सांगितले की, गर्भवती महिला आठवड्यातून दोन किंवा तीन वेळा सुरक्षितपणे ओव्याचा बटवा वापरू शकतात. पण, अस्वस्थता टाळण्यासाठी अतिवापर करणे टाळा; असेही त्या पुढे म्हणाल्या आहेत.

# इडली-डोश्यासारखे आंबवलेले पदार्थ आरोग्यासाठी खरोखरच चांगले असतात का? नक्की वाचा

दही, इडली, डोसा, ढोकळा, उत्तपा यासारखे आंबवलेले पदार्थ तुम्हाला नक्की आवडत असतील. हे पदार्थ भारतात प्रचंड लोकप्रिय आहेत. जगभरात आंबवलेले पदार्थ आवडीने खाल्ले जातात.

आंबवलेले अन्न किंवा पदार्थ, माणूस प्राचीन काळापासून खात आला आहे. मात्र अलीकडच्या काळात झालेल्या संशोधनातून आंबवलेल्या पदार्थांमुळे आरोग्याला होणाऱ्या फायद्यांबाबतच्या काही सर्वात महत्त्वाची प्रश्नांची उकल संशोधक करू लागले आहेत. केफिर, किमची, सॉअरक्रॉट (कोबी बारीक कापून किंवा किसून आणि आंबवून बनवलेला पदार्थ) आणि कोंबुचा हे सर्व वेगवेगळ्या प्रकारचे अन्नपदार्थ आहेत. मात्र या सर्वांमध्ये एक महत्त्वाची गोष्ट समान आहे. ती म्हणजे हे सर्व पदार्थ आंबवलेले असतात.

अन्न टिकवण्यासाठी माणूस प्राचीन काळापासून आंबवण्याच्या प्रक्रियेचा वापर करत आला आहे. प्रत्येक संस्कृतीत आंबवलेले पदार्थ असतात. आता आंबवण्याच्या प्रक्रियेचा प्रसार होतो आहे. त्याचे हजारो प्रकार आहेत. आंबवलेले अन्न किंवा पदार्थ आता औद्योगिक पद्धतीने अधिक तयार केले जातात, असं गॅब्रिएल विंडरोला म्हणतात. ते अर्जेंटिनातील नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ लिटोरा मध्ये सूक्ष्मजीवशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक आहेत. फक्त आपल्या स्वयंपाकघरात आंबवलेले पदार्थ तयार करण्याऐवजी औद्योगिक स्तरावर आंबवलेल्या पदार्थांचे उत्पादन करण्याचे फायदे आणि तोटे दोन्ही आहेत. आंबवण्याच्या प्रक्रियेमुळे रासायनिक प्रिझर्व्हे टिव्हची गरज भासत नसली तरी लंडनच्या किंग्स कॉलेजमधील संशोधकांना अलीकडेच एक गोष्ट आढळली. त्यांनी यूकेमधील सुपरमार्केटमधील काही आंबवलेल्या पदार्थांची तपासणी केली. त्यातील एक तृतीयांश आंबवलेल्या पदार्थांमध्ये ॲडिडिव्ह म्हणजे सहाय्यक पदार्थांचं मिश्रण केलेलं त्यांना आढळून आलं. हे ॲडिडिव्ह कायदेशीर मार्गदर्शक तत्वांच्या मर्यादेत होते. यात मीठ, साखर आणि कृत्रिम स्वीटनर्सचा समावेश होता. मात्र याचा अर्थ असा होतो की त्यातील काहींचं वर्गीकरण तांत्रिकदृष्ट्या अल्ट्रा–प्रोसेस्ड म्हणजे खूप जास्त प्रक्रिया केलेल्या पदार्थांमध्ये होतं. मग आंबवलेले पदार्थ खरोखरंच आपल्या आरोग्यासाठी योग्य असतात का की हे देखील एक प्रकारचे अल्ट्रा–प्रोसेस्ड म्हणजे खूप जास्त प्रक्रिया केलेले पदार्थ आहेत आणि ते आपण टाळले पाहिजेत? आंबवलेल्या पदार्थांचे आरोग्यासाठीचे फायदे आंबवलेल्या पदार्थांचा एक परिणाम म्हणजे त्यामुळे विशिष्ट पदार्थांमधील पोषकतत्वांची बायोअव्हेलॅबिलिटी त्यामुळे बदलू शकते. म्हणजेच आपलं शरीर एखाद्या विशिष्ट पदार्थांमधील पोषकद्रव्ये किती प्रमाणात शोषून घेऊ शकतं आणि त्यातून आपल्याला किती फायदा होऊ शकतो. अगदी अलीकडच्याच काळात आपल्याला आंबवण्याच्या प्रक्रियेचे आरोग्यासाठी असणारे संभाव्य फायदे लक्षात येण्यास सुरूवात झाली आहे. पाश्चात्य देशात आंबवलेल्या पदार्थांबद्दल रस वाढतो आहे. त्यामागचं कारण म्हणजे आपल्या पोटात (जठर, आतडे) असणारे सूक्ष्मजीव (जीवाणू, विषाणू इत्यादी) आणि त्याचा आपल्या एकंदरीत आरोग्यावर होणारा परिणाम आणि याचबरोबर आपल्या आहाराची यातील भूमिका याबद्दल पाश्चात्य देशांमध्ये जागृती वाढते आहे. आंबवण्याच्या प्रक्रियेमुळे नवीन जैविकदृष्ट्या कृतीशील म्हणजे बायोॲक्टिव्ह कम्पाऊंड्स तयार होऊ शकतात. उदाहरणार्थ आपल्या आरोग्यावर विविध परिणाम करणारे नैसर्गिक ॲसिड्स आणि विविध प्रकारचे पेप्टाईड्स, असं पॉल कॉटर सांगतात. ते आयर्लंडमधील टीगास्क फूड रिसर्च सेंटरमध्ये सीनियर प्रिन्सिपल रिसर्च ऑफिसर आहेत. ही आयर्लंडची कृषी आणि अन्नासंदर्भातील राष्ट्रीय संस्था आहे. काही बिगर आंबवलेल्या पदार्थांपेक्षा त्याच प्रकारच्या मात्र आंबवलेल्या पदार्थांमध्ये जास्त प्रमाणात पोषकद्रव्ये असतात असं आढळून आलं आहे.

# पावसात भिजल्यानंतर तुमच्या शरीरावर काय परिणाम होतो? तज्ज्ञांनी केला खुलासा

अनेकांना पावसात भिजायला आवडते. पावसाळा सुरू झाला की इच्छा असो किंवा नसो, आवडत असो किंवा नसो अनेकदा आपल्याला पावसात भिजावे लागते. कोरडे राहण्याचा कितीही प्रयत्न केला तरी मुसळधार पावसासमोर आपले काहीही चालत नाही. अनेकदा पाणी साचलेल्या रस्त्यातून नागरिकांना ये–जा करावी लागते किंवा वाहतूक कोंडीमुळे रस्ते ठप्प होतात, अशावेळी लोक बराच वेळ पावसात भिजतात. थोड्याशा पावसात भिजल्याने फारसा त्रास होत नसला तरी बराच वेळ ओल्या स्थितीत राहिल्याने आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. याबाबत 'द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना दिल्ली येथील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्स अंतर्गत औषधांचे वरिष्ठ सल्लागार म्हणून कार्यरत असलेले डॉ. सुरणजीत चॅटर्जी यांनी पावसात भिजण्याबाबत चेतावणी दिली आहे. पावसात भिजल्यानंतर व्यक्ती बराच वेळ ओल्या कपड्यांमध्ये राहिल्यास ते शरीरातील उष्णता काढून टाकते आणि शरीराच्या तापमानाचे नियमन करण्याची क्षमता धोक्यात येते, ज्यामुळे हायपोथर्मियाचा धोका वाढतो. असामान्यपणे शरीराचे तापमान कमी झाल्यास ही स्थिती उद्भवते, ज्यामध्ये रुग्णाला हुडहुडी भरते, तो गोंधळतो. तसेच काही गंभीर प्रकरणांमध्ये, रुग्ण बेशुद्ध होऊ शकतो, असेही डॉ. चॅटर्जी यांनी स्पष्ट केले. डॉ. चॅटर्जी यांच्या मते, दीर्घकाळापर्यंत ओले राहिल्यास हायपोथर्मियाशिवाय त्वचेच्या संरक्षणात्मक प्रणाली कमकुवत होऊ शकतात, ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो. बराच काळ पावसात भिजल्यास त्वचा सुरकतल्यासारखी दिसते. जे जीवाणू आणि बुरशीच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण तयार करू शकते.तुम्ही बराच काळ पावसात अडकल्यास काय करावे? हे धोके कमी करण्यासाठी शक्य तितक्या लवकर पावसापासून आश्रय घेणे सर्वोत्तम उपाय आहे. घरामध्ये पोहचताच ओले कपडे ताबडतोब काढून टाका आणि शरीर पूर्णपणे कोरडे करणे आवश्यक आहे. उबदार पेये प्या, जे शरीराचे मूळ तापमान नियंत्रित करण्यात मदत करू शकते, परंतु मद्यपान टाळा; कारण ते शरीराला नुकसान पोहचवू शकते.डॉक्टर चॅटर्जी यांनी सल्ला दिला की, हायपोथर्मियाची लक्षणे, जसे की थरथरणे, गोंधळणे किंवा अस्पष्ट बोलणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय मदत घेणे महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे संसर्गाची कोणतीही चिन्हे, जसे की लालसरपणा, सूज किंवा पू येणे आढळल्यास त्वरित तुमच्या डॉक्टरांकडे जाऊन उपचार घ्या.संभाव्य धोके समजून घेऊन आणि योग्य ती खबरदारी घेतल्यास, व्यक्ती बराचवेळ पावसात भिजल्यानंतरही संबंधित आरोग्याचे धोके लक्षणीयरीत्या कमी करू शकते.




# मुलांना अभ्यासाचा कंटाळा येतो, रोज मिळते पनिशमेंट, तर या ट्रिक्स वापरा, मुलं होतील अभ्यासात तरबेज!

सुट्ट्या संपून आता मुलांचं शाळेचं रूटीन बसलेलं आहे. शाळेत जाण्याची अन् टिफिन बनवण्याची आईची रोजची गडबड सुरू असेल. पण, शाळेला जाताना प्रत्येक आई रोज एक प्रश्न मुलाला विचारते. तो म्हणजे होमवर्क केला आहेस का? त्यावर मुलगा म्हणतो नाही ग आई, लक्षात नाही राहीलं. तर, अनेकवेळा असं होत आहे की, मुलांना होमवर्क न केल्याने शाळेत रोज शिक्षा केली जात आहे. काहींना वर्गाबाहेर उभं केलं जात आहे, तर काही विद्यार्थी रोजच अंगठे पकडून उभे राहतात. याच्या तक्रारीही पालकांकडे जात असतील. मात्र, मुलांना अभ्यासाची गोडी कशी लावावी हे याचं गणित काही पालकांना जुळत नाहीय. मुलांना अभ्यासाची गोडी कशी लावावी, त्यांनी स्वत:हून अभ्यासाचा विचार, सतत काहीतरी शिकण्याचा विचार कसा करावा यासाठी काही गोष्टी पालकांनीही करायला हव्या आहेत.कारण, सतत मुलं जर अभ्यासात कमी पडत असेल तर पालकांना त्याचं टेंन्शन असतं. या टिप्समुळे पालकांचा मनस्ताप कमी होईल. आणि तुमची मुलंही अभ्यास आवडीने करू लागतील. मुलांचे रूटीन ठरवा तुम्ही उठल्यापासून काय–काय करणार आहात. कितीवेळ झोप, कितीवेळ शाळा, खेळ अन् कितीवेळ अभ्यास हे मुलांच रूटीन पालकांनी फिक्स करायला हवं. शाळा सुरु झाल्यानंतर लगेचच हे रूटीन सेट केलं तर मुलांना त्याची सवय होते. त्यामुळे, मुलंही शाळेतून आलं की खेळून अभ्यासाला बसतात. त्यांना प्रत्येकवेळी अभ्यासाची आठवण नाही करून द्यावी लागत. मुलांना वेळ द्या मुलांच्या जन्मानंतर जशी त्यांना पालकांची गरज असते. खाणे,पिणे चालणे, बोलणे या वाढीत पालक मुलांची मदत करतात. पण, तुम्हाला माहिती आहे का, मुलांना अभ्यासातही तुमची मदत लागते. कारण, पालकांनी मुलांना फक्त अभ्यास करा असे सांगून उपयोग नाही. तर, त्यांनी स्वत: त्यासाठी वेळ काढावा लागेल. तर मुलं आवडीने अभ्यास करतील. मुलांवर दबाव टाकू नका सर्वांच्याच शाळा सुरु झाल्या आहेत. त्यामुळे मुलांवरही परीक्षा आणि अभ्यासाचा तणाव असेल. तर पालकांनी मुलांवर दबाव टाकू नये. काही पालक मुलांना शिक्षा करतात, उपाशी ठेवतात. पण जितके गोड बोलून त्यांच्याकडून अभ्यास करून घ्याल, तितका मुलंही मन लावून अभ्यास करतील. मुलांना उदाहरणं देऊन सांगा आपल्याला आपल्याशी संबंधित अनेक गोष्टी लक्षात राहतात. पण, तुम्हाला माहिती आहे का? अभ्यास लक्षात ठेवण्याची ही प्रभावी पद्धत आहे. तुम्ही मुलांना शिकवताना त्यांना गोष्टी, अनुभव आणि उदाहरणे देत शिकवत असाल तर त्यांना त्या गोष्टी नेहमी लक्षात राहतील. मुलांना खेळातून ज्ञान द्या मुलांना खेळायला खूप आवडतं. त्यामुळे प्ले–ग्रूप, नर्सरीसारख्या शाळेत जाणाऱ्या छोट्या मुलांना खेळातून कलर, आकडे, वस्तू यांचे ज्ञान दिले जाते. कारण, त्यांना खेळणं आवडतं. तस, तुम्हीही तुमच्या मुलांना खेळातून, आकडे, कलरफुल गेम्स यातून गोष्टी शिकवू शकता. विज्ञान, गणितसारखे विषय मुलं गेम्समधून अधिक प्रभावीपणे शिकू शकतात. मुलांना अभ्यासासोबत सामान्य ज्ञानही द्या तुम्ही काहीवेळा पाहिलं असेल की, नात्यातील मुलं फक्त अभ्यासू किडे असतात. ज्यांना फक्त पुस्तकी ज्ञान असतं. पण, अशा मुलांना 'जनरल नॉलेज' नसतं.

तुमचा मुलगा कशातही कमी रहायला नको असेल तर त्याला बाहेरील ज्ञानही द्या. तुम्ही त्यांना टीव्हीवर लागणारे प्रश्नोत्तरांचे कार्यक्रम दाखवू शकता. सामान्य ज्ञान असलेली पुस्तके देऊ शकता. हे ज्ञान त्यांना जीवनभर कामी येणार आहे.

# मलकापूरच्या शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी शरद पवार गटात जाहीर प्रवेश



किनवट/शेख शौकत :–आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने माजी आमदार प्रदीप नाईक यांनी मतदार संघात झंजावाती दौरे,गाठीभेटी व पक्षप्रवेश कार्यक्रमावर भर दिला असून त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व युवाकार्यकर्ते समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मलकापूर येथील शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस( शरद पवार )गटाचे माजी आमदार प्रदीप नाईक यांनी चौथ्या टर्मसाठी जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने प्रचंड मताधिक्य घेत विजयश्री खेचून आणल्यामुळे किनवट विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. माजी आमदार प्रदीप नाईक यांनी तुतारी वाजवणारा माणूस या निशाणीचा मतदारसंघातील प्रत्येक वाडी तांड्यात, खेड्यात जोरदार प्रचार व प्रसार सुरू केला असून झंजावाती बैठका,भेटीगाठी तसेच पक्षप्रवेश कार्यक्रमातुन त्यांना मतदारांचा अभूतपूर्व पाठिंबा लाभत असल्याचे दिसून येत आहे.दरम्यान प्रदीप नाईक यांचे खंदे समर्थक व अत्यंत विश्वास मानले जाणारे सुभाष नगर येथील युवाकार्यकर्ते समीर शेख यांच्या पुढाकारातून किनवट तालुक्यातील मलकापूर येथे नुकताच राष्ट्रवादीचा पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला.यावेळी अरबाज खान सय्यद इरफान सलीम खान अली खान शेख शाहरुख सय्यद सिद्दिकी सचिन आडे, सय्यद मोहसीन तसेच विविध पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी आमदार प्रदीप नाईक यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. प्रदीप नाईक यांच्या कार्यकाळातील विकास कामांना प्रभावीत होऊन आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहोत अशा भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत.विधानसभा निवडणुकीत प्रदीप नाईकाना निवडून आणण्यासाठी अथक परिश्रम घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी बाजार समितीचे संचालक बालाजी बामणे,तोटबा येथील सरपंच स्वप्नील राठोड, घोटीचे उपासरपंच राजू सुरोसे व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## झोपडपट्टी वाशीयांचे आधारस्तंभ हिरामण पगार (दादा) यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा

**तरूणाला लाजवेल आसे वयाच्या ७२ व्या वर्षी पण उत्साह आणि जोशपूर्ण महान कार्य हिरामण पगार सरांचे आहे अशा शब्दांत उपस्थितांनी (दादांना) दिल्या शुभेच्छा..!**






नवी मुंबई / के. एच. हनवते :– झोपडपट्टी वाशियांचे अधारसंभ व कामगार एकता युनियन चे अध्यक्ष, घर हक्क संघर्ष समिती चे संस्थापक अध्यक्ष आयु. हिरामण पगार सर यांचा ७२ वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी विरेंद्रजी लगाडे ( जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन सेना नवी मुंबई ), राजु वंजारे (सचिव, कामगार एकता युनियन ), अँड. सुजीत निकाळजे सर (मुख्य सल्लागार, घर हक्क संघर्ष समिती ), कैलाश सरकटे (खजिनदार, घर हक्क संघर्ष समिती ), प्रकाश वानखेडे (समता सैनिक दल ), दत्ता बनसोडे (मुख्य प्रवर्तक, टाटा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था ), कल्याणराव हनवते (पत्रकार दैनिक महावृत्त, बौध्दाचार्य), उमेश खंदारे (संघटक), लक्षिमण देडे, अशोक जमादार, जयसिंग रणदिवे, रेखा इंगळे (महिला अध्यक्ष रिपब्लिकन सेना नवी मुंबई ), सौ. दिपा बम (कार्याध्यक्ष रिपब्लिकन सेना महिला आघाडी नवी मुंबई), सो. संगीता चौधरी (रिपब्लिकन सेना) सौ. शांता खोत (युवा संस्था), सौ. छायाताई जाधव, इत्यादीं कार्यकर्ते पदाधीकारी यांनी उपस्थित राहून हिरामण पगार (दादा) याना पुढील कार्यास उदंड आयुष्य लाभो हिच सदिच्छा – शुभेच्छा.

# गाव तेथे क्रीडांगण ही संकल्पना लोप पावतेय





किनवट /शेख शौकत :–गाव तेथे क्रीडांगण ही संकल्पना आता लोप पावत चालली आहे. कारण नवीन तंत्रज्ञानाच्या युगात मुलांच्या हातात मोबाईल आल्याने लहान मुले आता मैदानी खेळ विसरले आहेत त्यामुळे त्यांचा शारीरिक विकासाला खिळ बसतेय की काय अशी भीती व्यक्त होत आहे. पूर्वीच्या काळी शहरात व ग्रामीण भागात मैदानी खेळ लहान मुलांसाठी खेळण्यासाठी उपलब्ध होते त्यात काचेच्या गोटया, विटू दांडू, चेंडू, खोखो, कबड्डी, कुस्ती, लंगडी, टायरची गाडी करून धाव लावणे असे विविध खेळ पूर्वी ग्रामीण भागात शहरात लहान मुले खेळत होती. त्यामुळे त्यांचा शारीरिक विकास फार झपाट्याने होता. खुजली खेळणे हे फार गरजेचे असते. आज लहान मुलांच्या हातात मोबाईल आल्याने त्यांची ओढ आता मैदानी खेळापासून दूर चालली आहे. मुले शाळेतून घरी आले की, बस मोबाईल घेऊन घराच्या कोपऱ्यात बसतात. आपल्या आवडीचे व्हिडिओ गेम बघत बसतात. त्यामुळे त्यांचा शारीरिक विकास होताना दिसून येत नाही ही भयानक चिंता आता पालकांना वाटू लागली आहे. पूर्वी शाळेत सुद्धा सायंकाळच्या वेळी शाळा सुटण्यापूर्वी १ तास अगोदर खेळ खेळले जायचे. त्यात लंगडी, खो खो, कबड्डी, चेंडू हे खेळ घेतले जात असतं. मुलाकडून खेळून घेतले जात नाही. शाळेतून घरी आले की, लगेच दप्तर ठेवले की शिकवणीच्या क्लासेसला मुलांना जावं लागतं. तिकडून आले की मुलं झोपी जातात. सकाळी उठतात, शाळेत जातात हा त्यांचा दैनंदिन बनला आहे. त्यांच्यासाठी खेळण्यासाठी बागडण्यासाठी आता वेळ फार कमी आहे. मैदानी खेळ हे शारीरिक विकासासाठी फार महत्वाचे आहेत, याकडे तेवढेच लक्ष देणे गरजेचे आहे. मोबाईलच्या युगामध्ये मुलांनी मैदानी खेळ सोडले ही चिंताजनक बाब आहे याकडे आवर्जून पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे असे जाणकार सांगत आहेत.

## उरण हत्याकांड कु. यशश्री शिंदे या घटनेचा आरपीआय (अ) च्या वतीने जाहीर निषेध




नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक : ३१/०७/२०२४ रोजी छ. शिवाजी महाराज चौक वाशी नवी मुंबई येथे आरपीआय (अ) चे राष्ट्रीय अध्यक्ष : दिपकभाऊ निकाळजे यांच्या आदेशानुसार आणि सुनिता ताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाने तसेच आरपीआय (अ) नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : राजेंद्र (दादा) गायकवाड यांनी नुकतेच उरण येथील हत्याकांडात कु. यशश्री शिंदे या तरुणीचा दाऊद शेख नावाच्या हरामखोरांनी निर्घृण हत्या केली यां घटनेचा जाहीर निषेध आंदोलन वाशी येथील भर चौकात करण्यात आले. यावेळी आरपीआय (अ) चे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने सफाई कामगार व स्वच्छता कामगारांचा सत्कार सन्मान सोहळा संपन्न.

### विभागीय सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले यांनी कामगारांचे केले कौतुक.




लातूर / प्रतिनिधी:– लातूर शहरातील कष्टकरी कामगार, सफाई कामगार बंधू भगिनींचा दिनांक ३१ जुलै हा दिवस सफाई कामगार बालीदान दिवस म्हणून देशातल्या अनेक जिल्ह्यात साजरा केला जातो. सफाई कामगारांचे स्वच्छता व सफाई मधील योगदान लक्षात घेऊन हा दिवस लातूरमध्ये अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने बुधवार दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी दुपारी दीड वाजता डॉ.भालचंद्र ब्लड बँक, बस स्टँड च्या पाठीमागे, गांधी मार्केट लातूर येथे सत्कार सन्मान सोहळा कामगार नेते राजकुमार होळीकर यांच्या मार्गदर्शनात मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. बुधवार दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी लातूर शहरातील स्वच्छता व सफाई चे काम करणाऱ्या, गटारी साफ करणारे, कचरा उचलणारे, वाहणारे कामगार, आदर्श गुणवंत व कर्तव्यदक्ष कामगारांचा आलेल्या मान्यवरांच्या हस्ते सत्कार, सन्मान करण्यात आला. तसेच स्वच्छता व सफाई काम करणाऱ्या कामगारांच्या दैनंदिन कामातील त्यांच्या अडी, अडचणी समजून घेत त्यांच्या असलेल्या अडचणीच्या प्रश्नांची चर्चा करून त्या सोडवण्याच्या संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आला. तसेच यावेळी स्वच्छता व सफाई चे काम करणारे ज्यामध्ये कचरा गोळा करणे व मैला कचरा वाहून नेणारे कंत्राटी कामगार, खाजगी संस्थेमार्फत काम करणारे यांच्यासाठी असलेल्या योजना व फायदे याची माहिती आलेल्या सर्व कामगारांना देण्यात आली. तसेच लातूर शहरातील महानगरपालिका अंतर्गत स्वच्छता व साफसफाई चे काम करणाऱ्या कचरा उचलणाऱ्या सर्व कायमस्वरूपी हंगामी रोजंदारी व खाजगी संस्थेमार्फत काम करणाऱ्या कामगारांचा सत्कार व सन्मान संघटनेच्या वतीने करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. प्रा. डॉ. माधव गादेकर (माजी प्राचार्य) तर या सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुणे, मार्गदर्शक म्हणून लातूर विभागीय सहाय्यक कामगार आयुक्त मा. मंगेश झोले, कामगार कल्याण अधिकारी प्रकाश धस, भटके विमुक्त समाज नेते प्राध्यापक सुधीर अनवले सर, कामगार संघटना सचिव शिवाजी डोंगरे, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस असंघटित कामगार कर्मचारी काँग्रेस महाराष्ट्र राजकुमार होळीकर यांच्या हस्ते आलेल्या कामगारांचा सत्कार व सन्मान करण्यात आला.

सत्कार सन्मान सोहळा कार्यक्रमाचे आयोजक म्हणून केंद्रीय कार्यकारणी संघटना सचिव शिवाजी भंडारे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य सुरेश काटे, लातूर शहराध्यक्ष अंकुश खळगे, महिला आघाडी प्रमुख नूतन अंगरखे हे होते. या कार्यक्रमाला विनंतीला मान देत चंद्रपाल गिरी, किशोर सगर, गौतम ससाने, प्रमोद बानाटे, मंगल शिंदे, रेणुका कांबळे, शीलाताई भोळे, अहिल्या इंगळे, महादेव कांबळे, आर. डी. गायकवाड, मजीद बागवान, सुरेश काळे, महेंद्र कांबळे, सूर्यकांत काळे, रावजी कांबळे, अमोल जाधव, महादेव लोंढे, शालुबाई जाधव, युनूस चाचा शेख आदींसह इतर कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात वृक्षरोपण.

### वृक्ष संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी : जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे






लातूर :– लातूर पोलीस व वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात श्रमदानातून वृक्षारोपण वृक्ष लागवड अन् संवर्धन ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. वृक्षांची चळवळ ही सर्वसमावेशक चळवळ असून, आपण झाडांकडून प्रत्येक व्यक्ती मोफत ऑक्सिजन घेतो. त्यामुळे वृक्ष संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन लातूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी केले. वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात श्रमदानातून वृक्षारोपण उपक्रम पार पडला. यावेळी ते बोलत होते.

वसुंधरा प्रतिष्ठान व लातूर पोलिसांच्या तर्फे पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आवारात शुक्रवारी सकाळी अर्जुन, करंज, चाफा, जास्वंद, बदाम, बकुळ, तुळस, आदींसह फुलांच्या झाडांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपण उपक्रम साठी वसुंधरा प्रतिष्ठान व लातूर पोलिसांच्या टीमने मागील २ दिवसांत खड्डे करून घेतले. शुक्रवारी सकाळी स्वतः जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे, भरोसा सेलचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. दयानंद पाटील यांनी श्रमदानात सहभाग घेत उत्साह वाढविला. त्यांच्या उपस्थितीत कार्यालयाच्या परिसरात या विविध झाडांची लागवड करण्यात आली.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील अधिकारी आणि अमलदारांच्या हस्ते प्रत्येकी एक झाड लावण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहायक पोलीस निरीक्षक दयानंद पाटील, पोलीस अमलदार रियाज सौदागर, भरोसा सेलचे महिला व पुरुष पोलीस अमलदार, वसुंधरा प्रतिष्ठानचे प्रा.योगेश शर्मा, रामेश्वर बावळे, अमोल आप्पा स्वामी, ड.अजित चिखलीकर, राहुल माशाळकर, उमेश आप्पा ब्याकोडे, गौसपाशा मणियार, वैभव वाघ, प्रशांत मसलगे आदींनी सहभाग घेतला.

उपस्थित पोलीस अमलदारांना प्रत्येकी एका झाडाची काळजी घेऊन झाडांना वाढवावे असे आवाहन पोलिस अधीक्षक यांनी केले.

## दोन आठवड्यांत शरद पवार – एकनाथ शिंदे यांची दुसऱ्यांदा भेट; चर्चांना उधाण

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज (दि.३) वर्षा निवासस्थानी भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये मराठा आरक्षणाबाबत चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. दोन आठवड्यांतील शरद पवार आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्यातील ही दुसरी भेट आहे. याआधी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीसंदर्भात एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली होती.

मराठा आरक्षणावर शरद पवार आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्यात चर्चा

दोन आठवड्यांतील शरद पवार आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्यातील ही दुसरी भेट

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वातावरण तापू लागले

जरांगेंच्या अल्टीमेटमनंतर भेटीला महत्त्व

राज्यात मराठा आरक्षणावरून वातावरण तापले आहे. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे–पाटील यांनी आरक्षणाबाबत निर्णय घेण्यासाठी १३ ऑगस्टपर्यंत



राज्य सरकारला अल्टीमेटम दिला आहे. या पार्श्वभूमीवर पवार आणि शिंदे यांची भेट महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही नेत्यांमध्ये मराठा आरक्षणाबाबत चर्चा झाली. दोन आठवड्यांतील शरद पवार आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्यातील ही दुसरी भेट आहे. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावर चर्चा सुरू झाली आहे. मराठा आंदोलनाबाबत तुमची भूमिका स्पष्ट करा, फडणवीसांचे विरोधकांना आवाहन उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले यांना माझा प्रश्न आहे. या मराठा आंदोलनाबाबत तुमची भूमिका स्पष्ट करा. ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण द्यायचे का, तुमचे समर्थन आहे का, ते स्पष्ट करा, अशी आक्रमक भूमिका मांडत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी नेत्यांना आवाहन दिले. तुमचा बुरखा फाडल्याशिवाय राहणार नाही. हा खोटारडेपणा समोर आणावाच लागेल, असे त्यांनी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE